आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार, दिनांक ०१ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. छत्रपती शिवरायांचा पुतळा पडल्याच्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीचा मुंबईत मोर्चा; तर महाविकास आघाडी राजकारण करत असल्याचा आरोप करत भाजपचं राज्यभर आंदोलन.

2. नागपूरमध्ये आयोजित महिला वन कर्मचारी व अधिकारी परिषदेत वन विभागाला श्रेष्ठतम बनविण्याचं वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचं आवाहन.

3. पोलीस पाटलांच्या थकित मानधनाचा प्रश्न मार्गी लावण्याचा शासन निर्णय उद्या निर्गमित करणार असल्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही.

4. राष्ट्रीय पोषण सप्ताहाला आजपासून देशभरात सुरुवात; अंगणवाडी केंद्रांवर विविध उपक्रम राबविण्यात येणार.

5. यवतमाळ आणि वाशीम इथं रेड अलर्ट सह अनेक जिल्ह्यांसाठी अतिवृष्टीचा इशारा.

****

मविआ आंदोलन

मालवणच्या राजकोट किल्ला परिसरात उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईत महाविकास आघाडीच्या वतीने गेट वे ऑफ इंडिया परिसरात राज्याच्या विद्यमान सरकारविरोधात आंदोलन करण्यात आलं. या घटनेतील दोषींवर कारवाई करून राज्याचा, छत्रपती शिवाजी महाराजांचा मान राखला पाहिजे, असं आवाहन खासदार छत्रपती शाहू महाराज यांनी यावेळी केलं. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणाबद्दल मागितलेली माफी मग्रूरीने मागितलेली असून ती आम्हाला मान्य नाही', असं आघाडीचे नेते उद्धव ठाकरे म्हणाले. 'राज्याच्या कानाकोपऱ्यात गेली कित्तेक वर्षे शिवरायांचे पुतळे उभे आहेत. परंतु मालवणच्या प्रकरणात भ्रष्टाचार झाला म्हणून हा प्रकार घडला. हा अपमान झाला म्हणून हे निषेध आंदोलन आहे.' असं आघाडीचे नेते शरद पवार यांनी सांगितलं. महाविकास आघाडीचे नेते, कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

भाजपचे राज्यव्यापी आंदोलन

भारतीय जनता युवा मोर्चाकडून महाविकास आघाडीच्या विरोधात आज राज्यव्यापी आंदोलन करण्यात आलं. नागपुरात छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याजवळ झालेल्या आंदोलनात भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांसह अनेक कार्यकर्ते सामील झाले होते. काँग्रेसने शिवाजी महाराजांचा सतत अपमान केला आहे. आणि आज तेच महाराजांच्या नावावर राजकारण करत आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांना सद्बुद्धी द्यावी म्हणून हे आंदोलन असल्याचं बावनकुळे यांनी आज पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

आंदोलन-प्रतिआंदोलन

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळणे तसेच राज्यातील महिलांवर होणारे अत्याचार यांच्या विरोधात महाविकास आघाडीने शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे पण याला प्रत्युत्तर म्हणून भाजपने विरोधकानांच सद्बुद्धी मिळावी म्हणून आंदोलन चालू केलं आहे. हा प्रकार चोराच्या उलट्या बोंबा असल्याचा आरोप विरोधी पक्ष नेते विजय वडडेटीवार यांनी आज नागपूर मध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना केला. तर महाविकास आघाडीचं हे आंदोलन पूर्णपणे राजकीय असून काँग्रेसनेच शिवाजी महाराजांचा अपमान इंदिरा गांधी यांच्या काळापासून केला आहे, असा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

सुधीर मुनगंटीवार

'इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वन विभागाचं बजेट सर्वाधिक आहे. वन संवर्धन, संरक्षण हे ईश्वरीय कार्य आहे, यामध्ये ‘आई’ प्रमाणे अत्यंत निष्ठेनं आणि जबाबदारीनं काम करणाऱ्या महिला कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचा अभिमान वाटतो. आता प्रत्येक क्षेत्रात वन विभागाला श्रेष्ठतम करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे या,' असं आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नागपुरात आज केलं. सदर येथील नियोजन भवन सभागृहात आयोजित महिला वन कर्मचारी व अधिकारी परिषदेत ते बोलत होते. यावेळी विभागाचे अधिकारी, महिला अधिकारी,महिला कर्मचारी यांची उपस्थिती होती.‘महाराष्ट्र शासनामध्ये प्रमुख पदांवर महिला अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. वनविभागाच्या प्रमुख पदी देखील शोमिता विश्वास असल्याबाबत मुनगंटीवार यांनी आनंद व्यक्त केला. वृक्ष लागवड, वन्यजीव संरक्षण, मानव वन्यजीव संघर्ष कमी

करण्याचे आव्हान या सर्व क्षेत्रांत वनविभागातील महिला अधिकारी आणि कर्मचारी कुठेही कमी पडलेल्या नाहीत, असं सांगून महिला अधिकारी आणि कर्मचारी परिषदेमधून चर्चा आणि संवाद वाढावा यासाठी दरवर्षी अशा परिषदेचं आयोजन करण्याच्या सूचना देखील मुनगंटीवार यांनी यावेळी केल्या.

<u>पोलीस पाटील</u>

राज्यातील पोलीस पाटिलांच्या गेल्या ४ महिन्यांच्या मानधानाचा विषय मार्गी लावण्यासाठी येत्या २ सप्टेंबर रोजी शासन निर्णय निर्गमीत करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपुरात दिली. पोलीस पाटिलांच्या सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्याच्या मागणीबाबत राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. डॉ.ईश्वर देशमुख क्रीडा महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित 'महाराष्ट्र राज्य गावकामगार पोलीस पाटील संघाच्या ८ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे प्रमुख अतिथी म्हणून फडणवीस बोलत होते. पोलीस पाटील हे गावचे गृहमंत्री असतात, कायदा सुव्यवस्थेसह या संरचनेत आता महिलासुरक्षा हे महत्वाचं कर्तव्य आहे. त्यासाठी पोलीस पाटलांनी अधिकाराबरोबरच कर्तव्याच्या जाणीवेतून कार्य करावं, असं आवाहन त्यांनी केलं. राज्य शासनानं या पदाला मान आणि मानधन मिळावं म्हणून वाढीव १५ हजार रुपये मानधन दिलं असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

<u>राष्ट्रवादी सन्मान यात्रा</u>

यवतमाळच्या पुसदमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांची आज नियोजित जनसन्मान यात्रा रद्द झाली आहे. पुसद उपविभागात रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सर्वत्र पाणी साचलं असल्याने ही यात्रा रद्द करण्यात आली असून पुढे लवकरच ही यात्रा होईल असं आमदार इंद्रनील नाईक यांनी सांगितलं आहे. दरम्यान, महायुती सरकार लाडक्या बहिणीच्या हितासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. जनसन्मान यात्रेनिमित्त वरुड मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र भुयार यांच्या नेतृत्वात आज मोर्शी इथं जाहीर सभा व रोड शो चं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय खोडके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## आकाशवाणी महासंचालक

भारतीय माहिती सेवेच्या वरिष्ठ अधिकारी डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर यांनी आज नवी दिल्ली इथं आकाशवाणीच्या वृत्तसेवा विभागाच्या महासंचालक म्हणून पदभार स्वीकारला. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत त्यांच्या 33 वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी विविध पदांवर काम केलं आहे.

## राष्ट्रीय पोषण सप्ताह

राष्ट्रीय पोषण सप्ताह आजपासून देशभरात सुरू होत आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या अन्न आणि पोषण मंडळातर्फे सन १९८२पासून दरवर्षी १ ते ७ सप्टेंबरदरम्यान हा सप्ताह आयोजित केला जातो. पोषण आणि आरोग्याबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करणं हा या सप्ताहाचा उद्देश आहे. "पोषण भी पढ़ाई भी" या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित ७व्या राष्ट्रीय पोषण महिन्यात ऍनिमिया नियंत्रण,मुलांच्या वाढीचे निरीक्षण, आणि महिलांना पूरक आहार यावर नागपुरात आयोजित अभियानात भर देण्यात येणार आहे. तर संपूर्ण सप्टेंबर महिन्यात अकोला जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांवर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. पोषण सप्ताहानिमित्त 'आईच्या नावे लावू एक झाड,' या उपक्रमांतर्गत अकोल्याच्या जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी बी वैष्णवी यांच्या हस्ते शेळद येथील अंगणवाडी केंद्रावर वृक्षारोपण करण्यात आलं.

## बॉम्बच्या अफवा

मध्य प्रदेशातल्या जबलपूर इथून हैदराबादला जाणाऱ्या इंडिगो एअरलाईन्स या कंपनीच्या विमानात बॉम्ब असल्याच्या अफवेमुळे ते नागपूर विमानतळावर उतरवण्यात आलं. यावेळी विमानात ७० प्रवासी होते. विमानाची सुरक्षा तपासणी केल्यानंतर कोणतीही संशयास्पद वस्तू न आढळल्याने ते हैदराबादला रवाना झालं.

## सिलिंडर किमतीत वाढ

व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीत ३९ रुपयांची वाढ झाली आहे. इंडियन ऑईलच्या संकेतस्थळावर ही माहिती देण्यात आली. याआधी गेल्या महिन्यात ८ रुपये ५० पैशांनी एलपीजी गॅसच्या किंमती वाढवण्यात आल्या होत्या, तर जुलैमध्ये गॅस सिलिंडरचे दर ३० रुपयांनी कमी झाले होते.

<u>जनजागृती कार्यक्रम</u>

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, सिम्बायोसिस लॉ स्कूल , नागपूर आणि अलायन्स अगेन्स्ट सेंटर्स ऑफ ट्रॅफिकिंग यांच्या सहकार्याने, मानवी तस्करी आणि मानवी तस्करीच्या विकसित आव्हानांवर लक्ष केंद्रित करणारा एक दिवसीय जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सिम्बायोसिस लॉ स्कूल इथं आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना गुन्हेगारी प्रतिबंध आणि मानवी हक्कांचे संरक्षण, याबाबत जागृत करणे विशेषत: असुरक्षित महिला आणि मुलांसाठी त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल प्रेरणा देणे हा होता. 350 हून अधिक विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास कायदा, आणि पोलीस क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केलं.

<u>हवामान</u>

यवतमाळ आणि वाशीम जिल्ह्यासाठी हवामान विभागानं आज अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केला आहे. वाशीम जिल्ह्यात आज सकाळपासून मुसळधार पाऊस कोसळत असून या पावसामुळे खंडाळा घाट इथं दरड कोसळल्याने वाशिम - पुसद मार्ग बंद झाला आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्था खोळंबली आहे. जिल्ह्यात सर्वाधिक पावसाची नोंद कारंजा, मानोरा मंगरूळपीर आणि वाशिम तालुक्यात झाली आहे. मुसळधार पावसामुळे अनेक नदी नाल्यांना पूर आणि शेकडो एकर शेतीचं नुकसान झाल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे. जिल्ह्यातील रहिवाशांना आणि नदी काठावरील राहणाऱ्या नागरिकांना प्रशासना कडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. यवतमाळच्या महागाव, उमरखेड, पुसद, दिग्रस तालुक्याला अतिपावसाचा तडाखा बसला असून शेकडो हेक्टर शेती क्षेत्रात पावसाचे पाणी शिरले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील कळंब इथं झाली असून त्यापाठोपाठ वर्धा जिल्ह्यातील देवळी इथं १०३ पूर्णांक ५ दशांश मिलीमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. उद्या अमरावती जिल्ह्यासाठी अतिवृष्टीचा रेड अलर्ट देण्यात आला असून अकोला, बुलढाणा, वाशीम, नागपूर आणि वर्धा इथं देखील मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तविली आहे.

******